# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government ofMaharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

**National Service Scheme**

**Dr. Shyam Khandare**
**Director**
Mo. No. - 7020482443

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email : nssdsw.gug@ gmail.com


पत्र क्र. No.GU/NSS/ 479 /2024 Dt : 25/11/2024

प्रती,

मा. प्राचार्य / विभाग प्रमुख / रासेयो कार्यक्रम अधिकारी
संलग्नीत सर्व रासेयो महाविद्यालये जिल्हा गडचिरोली.
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषयः— जिल्हास्तरीय युवा महोत्सव आयोजन सन २०२४—२५ करीता महाविद्यालयातील युवक व युवती यांना जिल्हास्तर युवा महोत्सवांत सहभागी करणेबाबत.

संदर्भः— जा.क्र.जिक्रीअ / जियुम / प्रवेशिका / २०२४—२५ / ११२९ दिनांक २१ / ११ / २०२४

महोदय,

उपरोक्त विषयान्वये युवकांचा सर्वांगिण विकास व्हावा, तसचे संस्कृती व परंपरा जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांचा वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता वाढिव लागणे या करीता प्रतिवर्षी राष्ट्रीय व राज्यस्तरावर युवा महोत्सवांचे आयोजन शासनामार्फत करण्यात येते, महाराष्ट्र राज्यामध्ये सन २०२४—२५ या वर्षातील जिल्हास्तर युवा महोत्सवांचे आयोजन मा. आयुक्त क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांनी आदेशित केल्यानुसार दिनांक ३० नोव्हेंबर २०२४ रोजी जिल्हास्तर युवा महोत्सवांचे आयोजन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, गडचिरोली, नेहरु युवा केद्र, एन.एस.एस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत होणार आहे.

सदर युवा महोत्सवांत आयोजीत करण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक बाबी त्याकरीता आवश्यक असलेले नियम, सहभाग कलाकार संख्या, कला सादरीकरणाकरीता आवश्यक असलेला वेळ व विजयी कलाकारांना देण्यात येणारे रोख पारितोषीक याबाबतचा संपुर्ण तपशिल या पत्रासोबत जोडलेला आहे. त्यानुसार जिल्हास्तर युवा महोत्सवांचे आयोजन करण्यात येणार आहे.

गोंडवाना विद्यापीठातील गडचिरोली जिल्हातील सर्व रासेयो महाविद्यालयातील विद्यार्थांना सहभागी होण्याचे आपल्या स्तरावरुन अवगत करुन १५ ते २९ वयोगटातील युवक व युवती यांना सहभागी होण्यास आपल्या स्तरावरुन आदेशित करुन सोबत जोडलेला विहित नमुन्यात प्रवेश अर्ज व ओळखपत्र जिल्हा क्रीडा अधिकारी, क्रीडा व सांस्कृतीक भवन, कॉम्पलेक्स एरीया गडचिरोली या ठिकानी दिनांक २९ / ११ / २०२४ रोजी सांय ५.०० वाजेपर्यंत आपला सहभाग या कार्यालयाच्या ई मेल आयडी dsogad2@gmail.com वर नोंदवावा(मुळप्रत दि.२९ / ११ / २०२४ जिल्हा क्रीडा अधिकारी, क्रीडा व सांस्कृतीक भवन, कॉम्पलेक्स एरीया गडचिरोली) व आपला प्रवेश निश्चीत करुन घ्यावा. याबाबत आपन आपल्यास्तरावरुन प्रयत्न करुन शासकिय उपक्रम यशस्वी करण्यात सहकार्य करावे, ही विनंती.

**डॉ. श्याम खंडारे**
**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, गडचिरोली
क्रीडा व सांस्कृतीक भवन,जिल्हा कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५.
Email-dsogad2@gmail.com

जा.क्र.जिक्रीअ/जियुम/प्रवेशीका /२०२४-२५/११२९ दिनांक :- २१/११/२०२४

**प्रति,**

**मा. संचालक,**
**राष्ट्रीय सेवा योजना,**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**विषय :-** जिल्हास्तर युवा महोत्सव आयोजन सन २०२४-२५
आपल्या महाविद्यालयातील / विद्यालयातील / मंडळाचे युवक व युवती यांना जिल्हास्तर युवा महोत्सवांत सहभागी करणेबाबत.

**संदर्भ :-** १. शासन निर्णय क्र.युकयो २०१२/प्र.क्र.६७/क्रीयुसे -३ दिनांक ०६/०१/२०१४
२. मा. सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, यांचे पत्र क्र.क्रीयुसे/युवा महोत्सव/२०२४/का.१०/१६११ दि. २६/०८/२०२४.
३. मा. सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.क्रीयुसे/युवा महोत्सव/२०२४/का१०/२८५९ दि.०५/११/२०२४.

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये युवकांचा सर्वांगिण विकास व्हावा, तसेच संस्कृती व परंपरा जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता वाढीव लागणे याकरिता प्रतिवर्षी राष्ट्रीय व राज्यस्तरावर युवा महोत्सवांचे आयोजन शासनामार्फत करण्यात येते. महाराष्ट्र राज्यामध्ये सन २०२४-२५ या वर्षातील जिल्हास्तर युवा महोत्सवांचे आयोजन संदर्भाधिन पत्र क्र. २ अन्वये मा. आयुक्त क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आदेशित केल्यानुसार दि. ३० नोव्हेंबर, २०२४ रोजी जिल्हास्तर युवा महोत्सवांचे आयोजन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, गडचिरोली, नेहरु युवा केंद्र, एन.एस.एस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत होणार आहे.

सदर जिल्हास्तर युवा महोत्वांत विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना" Innovation of Science and Technology, सांस्कृतिक कार्यक्रम (यात समुह लोकनृत्य, लोकगीत, वैयक्तीक सोलो लोकनृत्य, वैयक्तीक सोलो लोकगीत) कौशल्य विकास कार्यक्रम (यात कथालेखन, चित्रकला, वकृत्व, कविता) युवा कृती कार्यक्रम (यात हस्तकला, वस्त्रोद्योग, ॲग्रो प्रोडक्ट) इ. कार्यक्रांचे आयोजन करण्यात येणार आहे.

सदर युवा महोत्सवांत आयोजित करण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक बाबी त्याकरिता आवश्यक असलेले नियम, सहभाग कलाकार संख्या, कला सादरीकरणाकरिता आवश्यक असलेला वेळ व विजयी कलाकारांना देण्यात येणारे रोख पारितोषिक याबाबतचा संपुर्ण तपशिल या पत्रासोबत जोडलेला आहे. त्यानुसार जिल्हास्तर युवा महोत्सवांचे आयोजन करण्यात येणार आहे.

सदर जिल्हास्तर युवा महोत्सवांत प्राविण्य प्राप्त (सोबत दिलेल्या तपशिलानुसार) केलेला संघ / युवा कलाकार यांना त्यांनी प्राविण्य प्राप्त केल्यानुसार विभागस्तरावर आपली कला सादर करण्याची संधी मिळेल. त्यानुसार विभागावर प्राविण्य प्राप्त झाल्यास राज्यस्तरावर व राज्यस्तरावरुन प्राविण्य प्राप्त केल्यास राष्ट्रीय युवा महोत्सवांत सहभागी होण्याची संधी प्राप्त होणार आहे. तसेच प्रत्येक स्तरावर प्राविण्य प्राप्त झाल्यास शासनाकडून प्राविण्य प्राप्त युवा कलाकार / युवा संघ यांना रोख पारितोषिकही देण्यात येणार आहेत.

सदर जिल्हा युवा महोत्सवांत १५ ते २९ वयोगटातील युवक व युवती सहभागी होवू शकतील. (दि. १२ जानेवारी २०२५ रोजी वयाची परिगणना १५ ते २९ असावी) जन्म तारखेबाबत सबळ पुरावा म्हणुन जन्माचा दाखला जोडणे आवश्यक आहे. तसेच गडचिरोली जिल्ह्यांचा रहिवासी असल्याबाबत आधारकार्ड जोणे आवश्यक आहे.

त्यानुसार आपल्या अधिपत्याखालील महाविद्यालय / विद्यालय / मंडळ यांना सदर जिल्हास्तर युवा महोत्सवांत सहभागी होण्याचे आपल्या स्तरावरुन अवगत करुन १५ ते २९ वयोगटातील युवक व युवती यांना सहभागी होण्याबाबत आपल्या स्तरावरुन आदेशित करुन सोबत जोडलेला विहीत नमुन्यात प्रवेश अर्ज व ओळखपत्र जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, क्रीडा व सांस्कृतीक भवन, कॉम्पलेक्स एरिया, गडचिरोली याठिकाणी दि.२९/११/२०२४ रोजी दुपारी ०५.०० वाजेपर्यंत आपला सहभाग या कार्यालयाचा ई-मेल आयडी dsogad2@gmail.com वर नोंदवावा (मुळ प्रत दि. २९/११/२०२४ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, गडचिरोली येथे सादर करावी) व आपला प्रवेश निश्चित करुन घ्यावा. याबाबत आपण आपल्यास्तरावरुन प्रयत्न करुन शासकीय उपक्रम यशस्वी करण्यात सहकार्य करावे ही विनंती.

अधिक माहिती करिता संपर्क नंबर

१. श्री. एस.बी. बडकेलवार, राज्य क्रीडा मार्गदर्शक मो. ९५०३३३११३३
२. श्री. नाजुक उईके, राज्य क्रीडा मार्गदर्शक मो. ९०४९३३९९६६

तांत्रिक माहितीकरीता श्री. चंद्रशेखर मेश्राम, क्रीडा अधिकारी, ९५९५४६९८६७ व श्री. कुणाल मानकर, संगणक चालक, ८२७५७२०४२६ यांच्याशी संपर्क साधावा.

**सहपत्र :-**

१. जिल्हास्तर युवा महोत्सवांची कार्यक्रम पत्रिका.
२. जिल्हास्तर युवा महोत्सवांत प्राविण्यप्राप्त स्पर्धकांना द्यावयाच्या रोख पारितोषिक रक्कमेचा तपशिल.
३. जिल्हास्तर युवा महोत्सवांत सहभागी होण्याकरिता आवश्यक असलेल्या अटी व शर्ती.
४. जिल्हास्तर युवा महोत्सवांत सहभागी होणाऱ्या युवा संघाकरिता प्रवेश अर्ज नमुना.
५. जिल्हास्तर युवा महोत्सवांत सहभागी होणाऱ्या युवा वैयक्तीक करिता प्रवेश अर्ज नमुना.
६. स्पर्धकाने भरावयाचे ओळखपत्र.

आपला विश्वासू

(भास्कर घटाळे)
जिल्हा क्रीडा अधिकारी
गडचिरोली

प्रतिलीपी माहितीस्तव सविनय सादर.

१. मा. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. मा. जिल्हाधिकारी, गडचिरोली तथा अध्यक्ष जिल्हा युवा महोत्सव समिती, गडचिरोली
३. मा. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, नागपूर विभाग, नागपूर
४. मा. शिक्षणाधिकारी माध्य./प्राथ. जिल्हा परिषद, गडचिरोली

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, गडचिरोली

## जिल्हास्तर युवा महोत्सव कार्यक्रम

## २०२४-२५

| अ.क्र. | बाब | | सहभाग संख्या | स्पर्धेकरिता वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | सांस्कृतीक कार्यक्रम | समुह लोकनृत्य | १० | १५ मिनिट |
| | | वैयक्तीक सोलो लोकनृत्य | ०५ | ७ मिनिट |
| | | लोकगीत | १० | ७ मिनिट |
| | | वैयक्तीक सोलो लोकगीत | ०५ | ७ मिनिट |
| २ | कौशल्य विकास | कथालेखन<br>१००० शब्द मर्यादा<br>लेखनासाठी भाषा इंग्रजी, मराठी व हिंदी | ०३ | १ तास |
| | | चित्रकला | ०२ | ९० मिनिट |
| | | वकृत्व स्पर्धा<br>इंग्रजी व हिंदी | ०२ | ३ मिनिट |
| | | कविता<br>५०० शब्द मर्यादा | ०२ | ६० मिनिट |
| ३ | संकल्पना आधारित स्पर्धा | "विज्ञान व तंत्रज्ञान यामधील वनसंकल्पना"<br>Innovation in Science and Technology | ४० | ---- |
| ४ | युवा कृती | हस्तकला | ०७ | ---- |
| | | वस्त्रोद्योग | ०७ | ---- |
| | | ॲग्रो प्रोडक्ट | ०७ | ---- |

टिप :-

३. दिनांक २९/११/२०२४ रोजी दुपारी ०५.०० वाजेपर्यंत स्पर्धकांनी आपला प्रवेश अर्ज विहीत नमुन्यात जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, गडचिरोली येथे जमा करणे बंधनकारक आहे.

४. वेळेवर स्पर्धेच्या दिवशी प्रवेश दिला जाणार नाही.

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, गडचिरोली
# जिल्हास्तर युवा महोत्सव कार्यक्रम
## २०२४-२५

जिल्हास्तर युवा महोत्सवांत प्राविण्य प्राप्त संघ / युवक - युवती यांना खालीलप्रमाणे पारितोषिक रक्कम वितरीत करण्यात येणार आहे.

| अ. क्र. | बाब | | सहभाग संख्या | प्रथम | द्वितीय | तृतीय | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | संकल्पना आधारीत स्पर्धा | "विज्ञान व तंत्रज्ञान यामधिल नवसंकल्पना" "Innovation in Science and Technology" | ४० | १०००० | ६००० | ४००० | १४००० |
| १ | सांस्कृतिक | समूह लोकनृत्य | १० | ७००० | ५००० | ३००० | १५००० |
| | | लोकगीत | १० | ५००० | ३००० | २५०० | १०५०० |
| | | वैयक्तिक सोलो लोकनृत्य | ५ | ३००० | २००० | १५०० | ६५०० |
| | | वैयक्तिक सोले लोकगीत | ५ | ३००० | २००० | १५०० | ६५०० |
| २ | कौशल्य विकास | कथा लेखन | ३ | ३००० | २००० | १५०० | ६५०० |
| | | चित्रकला | २ | ३००० | २००० | १५०० | ६५०० |
| | | वक्तृत्व | २ | ३००० | २००० | १५०० | ६५०० |
| | | कविता | २ | ३००० | २००० | १५०० | ६५०० |
| ४ | युवा कृती | हस्तकला | ७ | ३००० | २००० | १५०० | ६५०० |
| | | वस्त्रोद्योग | ७ | ३००० | २००० | १५०० | ६५०० |
| | | ॲग्रो प्रोडक्ट | ७ | ३००० | २००० | १५०० | ६५०० |
| | | एकुण | १०० | ४९००० | ३२००० | २३००० | ९८००० |

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, गडचिरोली
# जिल्हास्तर युवा महोत्सव कार्यक्रम
## २०२४-२५

जिल्हास्तर युवा महोत्सवांतील स्पर्धात्मक बाबीकरिता खालीलप्रमाणे विषय व नियम राहतील

- या स्पर्धेमध्ये सहभागासाठी स्पर्धकांचे वय हे १५ ते २९ वयोगट राहील
  (१२ जानेवारी २०२५ या दिनांक रोजी वयाची परिगणना असावी)
- जिल्ह्यातील इंजिनिअीरंग कॉलेज, वैद्यकीय महाविद्यालये, कृषि महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शाळा, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, महिला मंडळ, युवक मंडळतसेच १५ ते २९ वयोगटातील युवक व युवती सहभागा करिता पात्र राहतील
- स्पर्धक हा गडचिरोली जिल्ह्याचा रहिवासी असावा.
- स्पर्धकांनी नाव पत्ता, जन्मतारीख, संपर्क क्रमांक, ईमेल आयडी व वयाबाबत सबळ पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | **समुह लोकनृत्य :-** | |
| | १ | लोकनृत्य सादरीकरणासाठी वेळ मर्यादा १५ मिनिटे राहील. |
| | २ | लोकनृत्य मध्ये सहभाग संख्या १० राहील. (साथसंगत धरुन १० संख्या असावी) |
| | ३ | भारतीय तसेच आदिम नृत्य सादरीकरणासाठी परवानगी राहील. बॅले डान्सला परवानगी राहणार नाही |
| | ४ | नृत्य संकल्पनेबाबत पवेशावेळी माहिती नमुद करणे आवश्यक राहील. तसेच गाण्याचे बोल लेखी स्वरुपात तीन प्रतित सादर करण्यात यावेत. |
| | ५ | वेषभुषा व शैलीदार नृत्य, संकल्पना, वेळ, मर्यादा, कल्पकता यांचा गुणांकनासाठी विचार करण्यात येईल. |
| | ६ | रेकॉर्ड केलेले गाणे व म्युझिक पात्र राहणार नाही. |
| | ७ | सादरीकरणामध्ये असभ्यता, धार्मिक व राजकीय भावना दुखावणार नाहीत यांची दखल घ्यावी. असे आढळल्यास सादर केलेले नृत्य अपात्र समजण्यात येईल. |
| | ८ | प्रथम क्रमांकाचा संघ पुढील स्तरावर पाठविण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| २ | **वैयक्तीक सोलो लोकनृत्य :-** | |
| | १ | सोलो लोकनृत्यासाठी वैयक्तीक एकाने सादरीकरण करणे आवश्यक राहील. |
| | २ | लोकनृत्य सादरीकरणासाठी वेळ मर्यादा ७ मिनिटे राहील. |
| | ३ | लोकनृत्य मध्ये सहभाग संख्या ०५ राहील. |
| | ४ | भारतीय तसेच आदिम नृत्य सादरीकरणासाठी परवानगी राहील. बॅले डान्सला परवानगी राहणार नाही. |
| | ५ | नृत्य संकल्पनेबाबत प्रवेशावेळी माहिती नमुद करणे आवश्यक राहील. तसेच गाण्याचे बोल लेखी स्वरुपात तीन प्रतित सादर करण्यात यावेत. |
| | ६ | वेषभुषा व शैलीदार नृत्य, संकल्पना, वेळ, मर्यादा, कल्पकता यांचा गुणांकनासाठी विचार करण्यात येईल |
| | ७ | रेकॉर्ड केलेले गाणे व म्युझिक पात्र राहणार नाही. |
| | ८ | सादरीकरणामध्ये असभ्यता, धार्मिक व राजकीय भावना दुखावणार नाहीत यांची दखल घ्यावी. असे आढळल्यास सादर केलेले नृत्य अपात्र समजण्यात येईल. |
| | ९ | प्रथम क्रमांकाचा संघ / युवा पुढील स्तरावर पाठविण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| ३ | लोकगीत समुह व वैयक्तीक :- | |
| | १ | लोकगीतासाठी वेळ मर्यादा ७ मिनिटे राहील. |
| | २ | लोकगीत (समूह) मध्ये सहभाग संख्या १० राहील. तसेच वैयक्तीक सोलो साठी एक राहील. |
| | ३ | गोण्याचे बोल भारतीय भाषेत असणे आवश्यक आहे. |
| | ४ | चित्रपटातील व Medley गाण्यास परवानगी राहणार नाही. |
| | ५ | वेषभुषा, गायनातील स्पष्टता व बोल, लयबध्दता, संकल्पना, वेळ मर्यादा याचा गुणांकनासाठी विचार करण्यात येईल. |
| | ६ | सादरीकरणामध्ये असभ्यता, धार्मिक व राजकीय भावना दुखावणार नाहीत याची दखल घ्यावी. असे आढळल्यास सादर केलेले गीत अपात्र समजण्यात येईल. |
| | ७ | प्रथम क्रमांकाचा संघ पुढील स्तरावर पाठविण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| ४ | कथालेखन :- | |
| | १ | कथालेखन खालील विषयाच्या संकल्पनेवर सादर करण्यात यावी.<br>"विज्ञान व तंत्रज्ञान यामधील वनसंकल्पना"<br>१) Innovation in Science and Technology |
| | २ | कथा लेखनासाठी १००० शब्द मर्यादा राहील. याकरिता वेळ मर्यादा १ तास राहील. |
| | ३ | कथा लेखानासाठी भाषा इंग्रजी, हिंदी व मराठी राहील. |
| | ४ | कथा ही पुर्व प्रसारीत झालेली नसावी. फेसबुक, सोशल मिडीया, पुस्तक इत्यादी मध्ये प्रसिध्द झालेली नसावी |
| | ५ | या स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या युवांनी संकल्पनेवर आधारित कथा लेखन सादर करणे आवश्यक राहील. विषयाची मौलिकता जपावा. कॉपी राईटचे उल्लंघन होणार नाही यांची दखल घेण्यात यावी. |
| | ६ | कथा लेखनामध्ये वैशिष्टपुर्ण पैलु, सुजनशील, नवनिर्मित, प्रकटीकरण इत्यादी बाबी विचारात घेण्यात येईल. तसेच कथेतील मुल्य व संदेश व्यक्त करणारे शिर्षक असावे. |
| | ७ | सहभागी युवांनी त्यांचे पुर्ण नाव - पत्ता - संपर्क क्रमांक - इमेल नमुद करावे |
| | ८ | कथा हस्तलिखित किंवा टंकलिखित (पी.डी.एफ.) मध्ये सादर करण्यात यावी. |
| | ९ | कथा युवा पोर्टल वर पोस्ट करण्यात यावी. |
| | १० | कथा लेखनातील प्रथम तीन क्रमांक जिल्हास्तरावरुन विभगस्तरावर पाठविण्यात यावेत. |

| | | |
|---|---|---|
| ५ | कविता :- | |
| | १ | प्रत्येक सहभागी युवा स्पर्धकाला एकच कविता लिहीण्याची मुभा राहील. |
| | २ | कविता लेखासाठी ५०० शब्द मर्यादा राहील. |
| | ३ | कविता लेखनासाठी ६० मिनिटे मर्यादा राहील. |
| | ४ | कॉपी राईट करुन कविता लिहु नये. अशा कविता अपात्र ठरविण्यात येतील. |
| | ५ | कवितेमध्ये असभयता, जात, लिंग, वंश, रंगभेद, धार्मिक व राजकीय भावना दुखवणार नाहीत याची दखल घ्यावी. असे आढळल्यास सादर केलेले कविता अपात्र समजण्यात येईल. |
| | ६ | जिल्हास्तरावरुन २ कविता विभागस्तरावर पाठविण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| ६ | चित्रकला स्पर्धा :- | |
| | १ | चित्रकला स्पर्धेसाठी प्रती २ जण पुढील स्पर्धेकरिता पाठविण्यात येतील. |
| | २ | स्पर्धेसाठी वॉटर कलर, ॲक्रेलिक, ऑईल पेन्ट, पेस्टल्स, चारकोल इ. मध्ये पेंटींग करण्याची मुभा राहील. पेपर साईज ए.३ वापरण्यात यावी. ११.७ ते १६.५ |
| | ३ | या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धेकास एकच पोस्टर / चित्र सादर करता येईल. |
| | ४ | सदर चित्र / पोस्टरसाठी २०-३० शब्दात शिर्षक देण्यात यावे. |
| | ५ | चित्र कॉपी राईट करण्यात येवु नये. |
| | ६ | वेळ मर्यादा ९० मिनीट राहील. |
| | ७ | स्पर्धा संपन्न झाल्यानंतर प्रदर्शन लावण्यात येईल. |
| | ८ | चित्र कोणत्याही संस्थेस व प्रातिनिक नावास उद्देशुन नसावे. |
| | ९ | चित्रावर नाव - पत्ता व संपर्क क्रमांक नमुद करावा. |

| | | |
|---|---|---|
| ७ | वकृत्व स्पर्धा (इंग्रजी व हिंदी) | |
| | १ | वकृत्व स्पर्धेकरिता ३ मिनिटे वेळ राहील. तसेच वेळ संपण्यापुर्वी ३० सेकंद आधि पुर्व सुचना साठी घंटा / बेल वाजविण्यात यावी. |
| | २ | इंग्रजी व हिंदी भाषेत वकृत्व सादरीकरण आवश्यक आहे. |
| | ३ | स्पर्धेकरिता विषय युवांना निवडण्याची मुभा राहील. सदर विषयावर सादरीकरण करता येईल. |
| | ४ | गणवेश सुयोग्य व औपचारिक असावा. |
| | ५ | सदर बाबीसाठी गुणांकन १०० मार्कचे राहील. |

| | | |
|---|---|---|
| ८ | संकल्पना आधारित स्पर्धा :- | |
| | १ | जिल्हास्तर युवा महोत्सव सन २०२४-२५ करिता संकल्पना आधारित बाबीसाठी "विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना" - Innovation in Science and Technology या संकल्पनेवर आधारित विज्ञान मेळाव्याचे आयोजन जिल्हास्तर युवा महोत्सवांत करण्यात येणार. |
| | २ | यात सहभाग संख्या ४० राहील. |
| | ३ | चांगले प्रकल्प, संकल्पना, प्रात्यक्षिक, माहिती तसेच पर्यावरण हानी होणार नाही. अशा प्रकल्पांचा यात अंतर्भाव असावा. |
| | ४ | विज्ञान व तंत्रज्ञान विषयक ज्या प्रणाली अस्तित्वात आहेत. त्या सोडून नवीन संकल्पना यांचा समावेश करावा. अदा. सुर्यमाला व धरणे इ. अस्तित्वातील प्रणाली या बाबीसारख्या सातत्याने प्रदर्शित होणाऱ्या संकल्पना शक्यतो अंतर्भाव करुन नये. |

| | | |
|---|---|---|
| ९ | युवा कृती :- | |
| | १ | १. हस्तकला, २. वस्त्रोद्योग, ३. ॲग्रो प्रोडक्ट या उपक्रकमाचा सहभाग राहील. |
| | २ | या अनुषंगाने कार्यक्रम, प्रदर्शन, नाविण्यपुर्ण संकल्पना इ. समावेश करुन स्पर्धा घेण्यात येतील. |

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, गडचिरोली
# जिल्हास्तर युवा महोत्सव कार्यक्रम २०२४-२५
## प्रवेश अर्ज (वैयक्तीक)

---

**युवा कलाकाराचे** नाव व संपुर्ण पत्ता व संपर्क नंबर :-

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

**संस्थेचे** / महाविद्यालयाचे / विद्यालयाचे / मंडळाचे नाव व संपुर्ण पत्ता व संपर्क नंबर :-

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

**स्पर्धा बाब** :- सांस्कृतिक कार्यक्रम / कौशल्य विकास / संकल्पना आधारित स्पर्धा / युवा कृती

**कलाप्रकार** :- ------------------------------------------------

<u>प्रवेश अर्ज</u>

| अ. क्र. | कलाकारांचे संपुर्ण नाव | जन्मतारीख | ई-मेल आय.डी. | व्हॉट्सअप नंबर | जन्म तारखेबाबत जोडलेला पुरावा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**संघ प्रमुखाचे** नाव व संपर्क नंबर :-

स्वाक्षरी व शिक्का

प्राचार्य / मुख्याध्यापक / अध्यक्ष / सचिव

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, गडचिरोली

## जिल्हास्तर युवा महोत्सव कार्यक्रम २०२४-२५

## प्रवेश अर्ज (सांघिक)

---

**संस्थेचे** / महाविद्यालयाचे / विद्यालयाचे / मंडळाचे नाव व संपुर्ण पत्ता व संपर्क नंबर :-

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

**स्पर्धा बाब** :- सांस्कृतिक कार्यक्रम / कौशल्य विकास / संकल्पना आधारित स्पर्धा / युवा कृती

**कलाप्रकार** :- ------------------------------------------------

<u>प्रवेश अर्ज</u>

| अ. क्र. | कलाकारांचे संपुर्ण नाव | जन्मतारीख | ई-मेल आय.डी. | व्हॉट्सअप नंबर | जन्म तारखेबाबत जोडलेला पुरावा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**संघ प्रमुखाचे नाव व संपर्क नंबर** :-

स्वाक्षरी व शिक्का

प्राचार्य / मुख्याध्यापक / अध्यक्ष / सचिव

# स्पर्धकांचे ओळखपत्र

स्पर्धकाचा

फोटो

६. स्पर्धकांचे नाव :- ------------------------------------------------------------

७. स्पर्धकांच्या महाविद्यालयाचे / विद्यालयाचे / मंडळाचे नाव व संपुर्ण पत्ता :- --------------------------------

------------------------------------------------------------------------------------

८. निवासाचा पत्ता :- ----------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

९. जन्मतारखेबाबत जोडलेल्या पुरावा बाबतचा तपशिल :- -------------------------------------------
(सोबत पुरावा जोडावा)

१०. स्पर्धेत ज्या बाबीमध्ये सहभाग घ्यावयाचा आहे. त्याबाबतीचे नाव नमुद करावे :- --------------------------

वरील प्रमाणे मी दिलेली माझी वैयक्तीक माहिती खरी असुन मी यासोबत जोडलेल्या जन्मतारखेच्या पुराव्यानुसार माझे वय -------------- इतके असुन मी जिल्हास्तर युवा महोत्सवांत नमुद केलेल्या वयोगटानुसार मी १५ ते २९ वयोगटात सहभागी होवु शकतो. तसेच जिल्हास्तर युवा महोत्सवांचे सर्व नियम व अटी मी वाचलेले असुन ते मला मान्य आहेत व त्याचप्रमाणे स्पर्धा दरम्यान परिक्षकांनी दिलेले निर्णय हे मला मान्य असतील.

स्पर्धकांचे नाव व स्वाक्षरी व दिनांक